# सार्वजनिक सूचना

## एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई

दिनांक : १२ एप्रिल २०२६

सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, ज्ञानदीप एज्युकेशन सोसायटी संचलित महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मालेगाव (सटाणा नाका, ता. मालेगाव, जि. नाशिक – ४२३ २०३) हे महाविद्यालय सध्या एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाशी संलग्नित (Affiliated) नाही.सदर महाविद्यालयाने विद्यापीठ तसेच शासनाने निर्धारित केलेल्या आवश्यक पायाभूत सुविधा व इतर अनिवार्य निकषांची पूर्तता केलेली नसल्यामुळे, संबंधित महाविद्यालयास संलग्नता प्रदान करण्यात आलेली नाही.म्हणून सर्व विद्यार्थी, पालक व संबंधित नागरिकांनी याची नोंद घ्यावी की, वरील महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेऊ नये. तसेच कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक व इतर संबंधित व्यवहार करू नयेत.ही सूचना सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सही/-

**कुलसचिव**

**एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ**